महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : १६२ वा | दिनांक : २५/०३/२०२५ | वार : मंगळवार

## नागपूर दंगल पेटवण्यास राज्य सरकारच जबाबदार : नाना पटोलेंचा



**मुंबई :** नागपुरच्या दंगलीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात जे मुद्दे मांडले त्यातून एक मुद्दा सुटला आहे. दंगलीचे समर्थन कोणीच करत नाही, पण दंगल कोणी निर्माण केली? त्याची सुरुवात कुठून झाली? या मुद्द्यावर मुख्यमंत्री बोलले नाहीत. या दंगलीवेळी एक हिरवी चादर पेटवण्यात आली, त्यावेळी पोलिस तेथे होते. आंदोलन करताना पोलिस अशा वस्तू ताब्यात घेते, पण नागपूर पोलिसांनी ती हिरवी चादर ताब्यात का घेतली नाही? ती चादर ताब्यात घेतली असती, तर ही घटना झालीच नसती. नागपूरला पेटवण्यात राज्य सरकारच जबाबदार होते हे ठामपणे सांगतो, असे काँग्रेसचे नेते नाना पटोले म्हणाले.

अंतिम आठवडा प्रस्तावावर विधानसभेत बोलताना नाना पटोले म्हणाले की, नागपूरची दंगल ज्या भागात झाली, त्या भागात मुख्यमंत्री फडणवीस यांचे बालपण गेले आहे. नागपूर शहर हे सर्वधर्म समभाव मानणारे आहे. आजपर्यंत असा प्रकार नागपूरमध्ये झाला नाही. या दंगलीवेळी पोलिसांची बघ्याची भूमिका राहिली. हिरवी चादर पेटवली गेली नसती तर दंगल झाली नसती ही वस्तुस्थिती आहे, यावर गृहमंत्र्यांनी उत्तर द्यावे असे नाना पटोले म्हणाले.

कॉमेडियन कुणाल कामरा यांनी एकनाथ शिंदे यांच्याबद्दल कविता केल्याने उद्रेक झाला, पण प्रशांत कोरटकर व राहुल सोलापूर यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान केला, त्याचे काय? त्यांना अटक का केली नाही? छत्रपतींच्या नावाने या दोघांनी अपशब्द वापरले, त्यांच्यावर कारवाई का केली नाही, त्याचे उत्तर द्यावे लागेल. प्रशांत कोरटकर कोणाचा हस्तक आहे? त्याचे आयपीएस अधिकाऱ्यांशी संबंध आहेत. जेलमध्ये असलेल्या महेश मोतेवारची जप्त केलेली आलिशान कार त्याच्याकडे कशी? राहुल सोलापूरकर कोणाचा माणूस आहे? छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान करण्याचा अधिकार यांना कोणी दिला? असे संतप्त प्रश्न विचारत पाशवी बहुमताच्या आधारावर जो कारभार चालला आहे, तो महाराष्ट्र पहात आहे, असे नाना पटोले म्हणाले.

परभणीतील सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मृत्युचा प्रश्न उपस्थित करत नाना पटोले म्हणाले की, सोमनाथ सूर्यवंशी यांचा मृत्यू दम्याच्या त्रासाने झाल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात सभागृहात सांगितले. आता जो अहवाल आला आहे, त्यात सूर्यवंशी यांचा मृत्यू मारहाणीमुळे झाल्याचे त्यात म्हटले आहे. परभणीत पोलिस लाठीहल्ल्याचे आदेश मंत्रालयातून दिले की पोलिस महासंचालक कार्यालयातून दिले, त्याचे उत्तर सरकारने द्यावे. बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख व सोमनाथ सूर्यवंशी हत्या प्रकरणी मुख्यमंत्री यांनी खुलासा करावा.

## फरार प्रशांत कोरटकर अखेर ताब्यात

**मुंबई :** छत्रपती शिवाजी महाराज यांच्याविषयी अपमानास्पद विधान करणाऱ्या फरार प्रशांत कोरटकरला अखेर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. महाराष्ट्र पोलिसांनी त्याला तेलंगणातील मंचारियालमधून दुपारी २:४५ वाजता ताब्यात घेतले असून पोलिसा कोल्हापूरकडे रवाना झाले आहे. प्रशांत कोरटकरला उद्या कोल्हापूर न्यायालयात हजर करण्यात येणार आहे, अशी माहिती कोल्हापूरचे एसपी महेंद्र पंडीत यांनी दिली.

प्रशांत कोरटकरवर इतिहास संशोधक इंद्रजित सावंत यांना धमकी दिल्याचा व छत्रपती शिवाजी महाराज यांचा अवमान केल्याचा आरोप आहे. या प्रकरणी पोलिस गत २५ फेब्रुवारीपासून त्याचा शोध घेत होते. पण तो पोलिसांना गुंगारा देत होता. अखेर पोलिसांनी सोमवारी त्याला तेलंगणातून ताब्यात घेतले. तेलंगणात त्याच्या अटकेची योग्य ते सोपस्कार पार पाडल्यानंतर त्याला कोल्हापुरात आणले जाईल. प्रशांत कोरटकरवर कोल्हापूरच्या जुना राजवाडा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. त्यामुळे त्याला तिथे आणले जाईल.

प्रशांत कोरटकरचा नागपूर, इंदूर, मुंबई, चंद्रपूर येथे शोध घेण्यासाठी पोलिसांची विविध पथके गठीत केली होती. सदर आरोपीचा अटकपूर्व जामीन देखील कोल्हापूर न्यायालयाने फेटाळला होता. आज देखील आरोपीच्या अटकपूर्व जामीनावर सुनावणी होती. दुपारी साडेचार वाजता ही सुनावणी होणार होती. परंतु, त्याआधीच कोल्हापूर पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले आहे. त्यामुळे अटकपूर्व जामीनाचा अर्ज न्यायालयाने रद्द केलेला आहे. दुपारी २ वाजून ४५ मिनिटांनी प्रशांत कोरटकरला ताब्यात घेतले असून पोलिसांचे पथक त्याला घेऊन कोल्हापूरकडे रवाना झाले आहे. रात्री उशिरा आरोपीला कोल्हापुरात आणल्यानंतर पुढील कायदेशीर प्रक्रिया पार पाडून उद्या न्यायालयासमोर हजर केले जाईल, अशी माहिती कोल्हापूरचे पोलिस अधीक्षक महेंद्र पंडित यांनी पत्रकार परिषदेत दिली आहे.

## महाराष्ट्र विधानसभेत महात्मा फुले, सावित्रीबाईंना 'भारतरत्न' देण्याचा ठराव मंजूर



**मुंबई :** महात्मा जोतिबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई यांना ‘भारतरत्न’ देण्याचा ठराव सोमवारी विधानसभेत एकमताने मंजूर करण्यात आला आहे. क्रांतीसूर्य महात्मा जोतिबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्काराने सन्मानित करावे, यासाठी केंद्र सरकारला शिफारस करण्याचा ठराव राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी विधानसभेत मांडला होता. या ठरावाला छगन भुजबळ यांनी पाठिंबा दर्शवला. यानंतर विधानसभेत एक मताने हा ठराव मंजूर करण्यात आला आहे.

महाराष्ट्र विधानसभेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू आहे. सभागृहात सत्ताधारी आणि विरोधक यांच्यात विविध मुद्द्यांवर तीव्र वाद सुरु आहेत. एकीकडे आरोप-प्रत्यारोपाची फेरी सुरू असताना, दुसरीकडे विधानसभेत सर्वांच्या एकमताने उपरोक्त महत्त्वपूर्ण ठराव मंजूर करण्यात आला आहे.

हा ठराव ऐतिहासिक असून प्रगत, पुरोगामी, सुधारणावादी महाराष्ट्राच्या लौकिकात भर घालणारा तसेच ‘भारतरत्न’ पुरस्काराचा गौरव वाढवणारा आहे, अशा शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आनंद व्यक्त केला आहे. संपूर्ण देशवासीयांच्या लोकभावनेचा आदर करणारा हा ठराव सर्वानुमते मंजूर होण्यासाठी सहकार्य करणाऱ्या सर्व विधिमंडळ सदस्यांचेही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आभार मानले आहेत.

महात्मा जोतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी मुलींची पहिली शाळा पुण्यात सुरु करुन, स्त्रीशक्तीला शिक्षणाची दारे खुली करुन दिली. आज शेती, शिक्षण, ज्ञान, विज्ञान, संशोधन, अंतराळ, राजकारण, समाजकारण अशा सर्व क्षेत्रात महिला मोठ्या संख्येने जबाबदारीच्या पदांवर कार्यरत राहून देशाच्या विकासात आपले योगदान देत आहेत. याचे संपूर्ण श्रेय महात्मा फुले आणि सावित्रीबाईंनी त्या काळात दाखवलेल्या दूरदृष्टी, घेतलेल्या कष्टाला आहेत. समाजातील दुर्बल, वंचित, बहुजन समाजापर्यंत शिक्षणाची गंगा नेण्यासाठी या दाम्पत्याने केलेले कार्य अलौकिक आहे. त्यामुळेच शेतकरी, कष्टकरी घटकांसह समस्त देशवासियांसाठी ते कायम ‘महात्मा’ राहणार आहेत. त्यांना ‘भारतरत्न’ देण्याचा महाराष्ट्र विधानसभेने मंजूर केलेला ठराव हा लोकभावनेचा आदर करणारा आणि ‘भारतरत्न’ पुरस्काराचा गौरव वाढवणारा ठराव आहे, अशा शब्दात उपमुख्यमंत्री पवार यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २५ मार्च २०२५

## सार्वजनिक भिमजयंती महाउत्सव समितीच्या अध्यक्षपदी दिपक निकाळजे यांची निवड



**छत्रपती संभाजीनगर :** दरवर्षीप्रमाणे छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) शहर व जिल्ह्यामध्ये विश्वरत्न परमपुज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी आदर्श जयंती उत्सव दरवर्षी प्रमाणे याही वर्षी विवीध सामाजिक उपक्रमाव्दारे एक आदर्श भिमजयंती उत्सव साजरा करण्यासाठी आंबेडकरी चळवळीत - निष्ठेने सक्रिय काम करणाऱ्या तसेच वर्षभर प्रस्थापित व्यवस्थेला आव्हान देऊन समाजाच्या न्याय हक्कासाठी - लढणाऱ्या व समाजाला न्याय हक्क मिळवून देणाऱ्या आंबेडकरी चळवळीच्या सर्व स्वाभिमानी जिगरबाज भीमसैनिकांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये सुभेदारी विश्रामगृह येथे महत्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली होती.आज झालेल्या या भिमजयंती महोत्सवाच्या महत्वपूर्ण बैठकीमध्ये सर्वपक्षीय आंबेडकरवादी पक्ष संघटनांच्या वतीने छत्रपती संभाजीनगर शहर व जिल्ह्याच्या सर्वपक्षीय भिमजयंती उत्सव समिती-१३४ ची कार्यकारणी जाहीर करण्यात आली आहे.सर्वानुमते जाहीर करण्यात आलेली जयंती उत्सव समितीची कार्यकारिणी पुढील प्रमाणे अध्यक्ष -दिपकभाऊ निकाळजे, उपाध्यक्ष-अरविंद कांबळे, अनिल बिररे,सचिन जोगदंडे,विशाल इंगळे,कार्याध्यक्ष -अमित वाहुळ, आनंद कस्तुरे,स्वागताध्यक्ष-काकासाहेब काकडे,कुंदन लाटे सचिव-नागेश केदारे,मोहनमामा म्हस्के कमलेश नरवडे, सहसचिव-नितीन निकाळजे,आनंद बोर्डे,विजय पैठणे.सरचिटणीस-विजय शिंगारे, मुकेश खोतकर,नितीन आदमानेकोषाध्यक्ष-मिलिंद पट्टेकर,दिपक सरोदे,सहकोषाध्यक्ष-सिद्धार्थ सुर्यवंशी,विकास वाव्हळ सल्लागार-जगविख्यात बौध्द धम्मगुरु विशुद्धानंद बोधी महाथेरो,भन्ते नागसेन बोधीथेरो,भंते संघप्रिय थेरो,भंते बोधिधम्मो,भन्ते निर्वाण, प्रकाशदादा निकाळजे, अशोकदादा बोर्डे, राजू साबळे,राजु आमराव,सतिश गायकवाड,महेंद्र राऊत,सचिन रुपवते,संतोष चव्हाण, डॉ. दीपक खिल्लारे, विजय बचके, किशोर ससाने, प्रसिद्धी प्रमुख-अनामी मोरे, गौरव मोरे, कुमार वाघमारे सदस्य:-सचिन शिंगाडे,योगेश वर्मा, राम पाखरे, संदीप निकाळजे,अविनाश डोंगरे, अक्षय जाधव, संदीप जाधव, सतीश सोनवणे,बुध्दभुषण निकाळजे,प्रशांत मस्के,योगेश सोनवणे,आनंद दांडगे, हरिदास वानखेडे, शुभम जमधडे, रोहित परदेशी, नासिर पठाण, नितीन भगत, सचिन मगरे,शुभम गंगावणे,कुणाल कासार, निखिल निकाळजे,तक्षिण दाभाडे,दादाराव सोनट्टके नासेर पठाण अजय राऊत दिपक गवळी व पत्रकार बंधु तसेच सर्व सामाजिक राजकिय चळवळीत काम करणाऱ्या स्वाभिमानी भीमसैनिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती होती.मागिल अनेक वर्षापासुन छत्रपती संभाजीनगर शहर जिल्ह्यात विवीध सामाजिक उपक्रमाद्वारे बाबासाहेबांच्या विचारांची भिमजयंती महाउत्सव यशस्वीपणे पार पाडत असल्याने सलग चौथ्यांदा सर्व पक्ष संघटनी एकत्र येऊन सर्वपक्षिय सार्वजनिक जयंती महाउत्सव समितीच्या अध्यक्षपदी दिपकभाऊ निकाळजे यांची निवड करण्यात आली आहे.

## भंडारा ग्रामीण पोलिस निरीक्षक गणेश पिसाळ यांची मोठी कारवाई - ४० लाखांचे सुगंधित तंबाखू सह इतर मुद्देमाल जप्त



**भंडारा :** भंडारा ग्रामीण पोलीस ठाण्याचे निरीक्षक श्री गणेश पिसाळ यांनी ४० लाख रुपये किमतीचे प्रतिबंधित सुगंधित तंबाखू जप्त करून मोठी यशस्वी कारवाई केली आहे.पोलिस अधीक्षक नुरुल हसन यांच्या मार्गदर्शनात आणि गोपनीय माहितीच्या आधारे, पहाटे ४:३० वाजता रायपूरहून नागपूरकडे जाणाऱ्या एका ट्रकवर कारधा चौक येथे सापळा रचून कारवाई करण्यात आली.या ट्रकमधून सुगंधित तंबाखूचा मोठा साठा सापडला असून, हे तंबाखू उत्पादने महाराष्ट्रात विक्रीसाठी आणले जात होते, असे प्राथमिक तपासात समोर आले आहे.पोलिस निरीक्षक गणेश पिसाळ यांच्या नेतृत्वाखालील पथकाने दोन इसमांना ताब्यात घेतले असून, या प्रकरणात गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू आहे.सुगंधित तंबाखू उत्पादने राज्यात प्रतिबंधित असल्याने ही वाहतूक बेकायदेशीर असून, यामुळे जनतेच्या आरोग्याशी खेळ होतो, हे लक्षात घेता ही कारवाई अत्यंत महत्वाची मानली जात आहे.श्री गणेश पिसाळ यांच्या धाडसी आणि चौकस कारवाईचे सर्वत्र कौतुक होत आहे. जिल्ह्यातील अवैध व्यापारावर अंकुश ठेवण्यासाठी पोलिस विभाग सज्ज असल्याचे या यशस्वी कारवाईने पुन्हा सिद्ध केले आहे.

## जेईएस महाविद्यालयात उद्योजकता विकास कार्यशाळा संपन्न



**जालना (प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे) :** येथील जेईएस महाविद्यालय जालनाच्या वाणिज्य विभाग आणि इंडो जर्मन टूल रूम छत्रपती संभाजी नगर यांच्या संयुक्त विद्यमाने उद्योजकता विकास कार्यशाळा दिनांक २१ मार्च २०२५ शुक्रवार रोजी आयोजित करण्यात आली होती.

यावेळी प्रमुख वक्ते फॉर्मल ट्रेनिंग स्कूल छत्रपती संभाजी नगरचे श्री मनोज ठाकरे व समंत्रक श्री राजेश चंचलानी संभाजीनगर हे दोघे होते यावेळी बोलताना श्री मनोज ठाकरे म्हणाले की व्यापारी शिक्षण हे सर्व युवकांना योग्य संधी देते. त्यामुळे प्रत्येकाने इच्छा नुसार आपले क्षेत्र निवडले पाहिजे गव्हर्मेंट ऑफ इंडियाने बऱ्याच रोजगाराच्या संधी विविध क्षेत्रात उपलब्ध करून दिल्याचेही त्यांनी सांगितले. तसेच श्री राजेश चंचलाणी यांनी उद्योजकता जागरूकता या विषयावर विद्यार्थ्यांना सविस्तर असे मार्गदर्शन केले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.गणेश अग्निहोत्री होते, उपप्राचार्य डॉक्टर महावीर सदावर्ते यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. गणेश कुलकर्णी यांनीकेले . कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ. सूर्यकांत चौगुले यांनी केले उपस्थिताचे आभार डॉ. संकेत चौबे यांनी मानले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



PARAKH-NCERT तर्फे यशदा पुणे येथे महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे यांच्यातर्फे घेण्यात आलेल्या पाच दिवशीय कार्यशाळेत 'रिसोर्स पर्सन ऑफ मराठी (इयत्ता-१ २वी) कार्य केल्याबद्दल राज्य मंडळाचे अध्यक्ष डॉ. शरद गोसावी यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन प्रा. डॉ.राजेंद्र सोनवणे यांचा गौरव करण्यात आला.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २५ मार्च २०२५


## महावितरण तर्फेच विद्युत कायदा २००३ चे सर्रास उल्लंघन

**भंडारा (एम. वी. बनसोडे) :** विद्युत कायदा २००३ मधील कलम ५६(१) नुसार, कोणत्याही वीज ग्राहकाचा वीजपुरवठा खंडित करण्याआधी किमान १५ दिवसांची लेखी नोटीस देणे बंधनकारक आहे. मात्र प्रत्यक्षात महावितरणचे कर्मचारी या कायद्याचे सर्रास उल्लंघन करत असल्याचे भंडारा जिल्ह्यातील अनेक प्रकरणांतून स्पष्ट झाले आहे.राज्य पातळी मानवी हक्क संरक्षक श्री एम. व्ही. बनसोड यांनी या प्रकाराची गंभीर दखल घेत महावितरण भंडारा कार्यालयास जाब विचारला असता, अधिकाऱ्यांनी उत्तर दिले की, "आम्ही नोटीस SMS द्वारे पाठवतो" आणि यासाठी त्यांनी MERC (महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग) यांचा आदेश दाखवला.मात्र, त्या आदेशात हे देखील स्पष्ट नमूद आहे की, अशा प्रकारे SMS द्वारे नोटीस देण्याची प्रणाली नागरिकांमध्ये जनजागृती करूनच लागू करावी, जे महावितरणने अजिबात केलेले नाही. त्यामुळे नागरिकांना SMS नोटीसची कल्पनाच नसते, आणि अचानक वीजपुरवठा खंडित होतो, ज्यामुळे मानसिक त्रास आणि मूलभूत हक्कांचे उल्लंघन घडते.श्री बनसोड यांनी यावर ठाम भूमिका घेत MERC च्या निर्णय प्रक्रियेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. MERC ने सर्वसामान्य नागरिकांचे हित डोळ्यासमोर ठेवून निर्णय घेतले आहेत का? की केवळ महावितरणच्या सुविधेसाठी? असा सवाल उपस्थित होत आहे."ही बाब केवळ कायद्याच्या उल्लंघनाची नाही, तर ग्राहक हक्क, मानवी हक्क आणि न्यायप्रक्रियेच्या विरोधातील कृती आहे," असे श्री एम. व्ही. बनसोड यांनी स्पष्ट केले असून, नागरिकांनी अशा कोणत्याही अनुचित वीजपुरवठा खंडनाच्या प्रकरणात त्वरित संपर्क साधावा, असे आवाहनही त्यांनी केले आहे.या मुद्द्यावरून महावितरण आणि MERC या दोघांवरच पारदर्शकतेचा प्रश्न निर्माण झाला असून, यासंदर्भात कायदेशीर लढाई उभी राहण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## राजीव गांधी महाविद्यालयात पदवी प्रमाणपत्र वितरण सोहळा संपन्न




**छत्रपती संभाजीनगर :** करमाड येथील राजीव गांधी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या सभागृहात वर्ष २०२३ २४ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या बी.ए. बी.कॉम ,बीएससी च्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वाटप करण्यात आले या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदाशिव मुळे होते. तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर येथील व्यवस्थापन परिषद सदस्य प्राचार्य डॉ.भारत खंदारे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

या कार्यक्रमासाठी संस्थेच्या सचिव श्रीमती डॉ शैलजा जोशी मॅडम यांची विशेष उपस्थिती होती. या कार्यक्रमांमध्ये प्रमुख अतिथी डॉ. भारत खंदारे यांनी बीज भाषण करताना विद्यार्थ्यांना शैक्षणिक सामाजिक व सांस्कृतिक जीवन जगत असताना पदवीनंतरच्या विविध जबाबदारी व नोकरी व्यवसाय या विषयी सखोल मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण किती महत्त्वाचे आहे याविषयी उपदेश करून विद्यार्थ्यांना भविष्यात यशस्वी जीवनाचा संदेश दिला .पदवी घेऊन कौशल्य विकसित करून यशस्वी व्हावे व सामाजिक जडणघडणीत सहभाग घ्यावा असे भावनिक आवाहन केले.

या कार्यक्रमाचा अध्यक्ष समारोप करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदाशिव मुळे यांनी महाविद्यालयाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा शैक्षणिक, व व्यक्तिमत्व विकास घडून आनण्यासाठी महविद्यालयात विविध उपक्रप राबउन मार्गदर्शन केले जाते.. त्यांनी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले मानले. यावेळी विचार मंचावर सर्व विद्या विषय शाखांचे प्रमुख उपस्थित होते. त्यामध्ये महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.मनोज देवकर .डॉ अश्विनी कुमार चिंचोलकर. प्रा बाळासाहेब लिहिणार. प्रा. डॉ. लक्ष्मण दांडगे उपस्थित होते या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. नरेश डहाळे यांनी केले.व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. सुखदेव पोटदुखे यांनी केले.तर आभार प्रा. डॉ.नानासाहेब लावंड यांनी मानले. यावेळी, प्रा. जयश्री पाटील ,श्रीमती रोहिणी जोशी, प्रा.रमेश कचरे,प्रा. माठे .प्रा. गोल्ड ,प्रा.राऊत,प्रा.साबळे, श्री वैद्य, प्रा. कुराडे,प्रा. चव्हाण.श्री देशपांडे श्री जाधव कैलास , श्री जाधव रमेश. महाविद्यालयीन विद्यार्थी , प्राध्यापक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी,यांची उपस्थिती होती.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड प्रिंटर्स

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद.

मो. 8087880274,8956362639, 9270446603, 9405109103

डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.

बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW), आरोग्य निरीक्षक, आरोग्य पर्यवेक्षक, स्वच्छता निरीक्षक या पदासाठी आवश्यक असलेला शासनमान्य

Sanitary Health Inspector

सॅनेटरी हेल्थ इन्स्पेक्टर

या कोर्ससाठी प्रवेश चालु आहेत

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903


## फोस्टर डेव्हलपमेंट महाविद्यालयात पदवी वितरण समारंभ संपन्न




**छत्रपती संभाजीनगर:-** येथील फोस्टर डेव्हलपमेंट शिक्षण शास्त्र महाविद्यालय व व्यवस्थापन शास्त्र महाविद्यालय (एमबीए) येथे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ मधून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा.श्री. भाऊसाहेब राजळे यांच्या हस्ते पदवी प्रमाणपत्र वितरण करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष श्री द्वारकाभाऊ पाथ्रीकर, विशेष अतिथी श्री गणेश मेंद हे होते. यावेळी एमबीए चे संचालक डॉ. अमित राजळे, प्राचार्या. डॉ सुनीता पेटकर, डॉ योगेंद्र पवार, डॉ. बेबी सिंग, डॉ. मंजुषा कुलकर्णी, श्री. धम्मानंद गायकवाड, श्री. संतोष ठोंबरे, श्रीमती प्रिती नागुरे व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती अश्विनी जैवळ यांनी केले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २५ मार्च २०२५

# पुसद उपजिल्हा रुग्णालयाच्या महिला वैद्यकीय अधीक्षकावर अखेर गुन्हा

## प्रसूतीदरम्यान झाला होता महिलेचा मृत्यू : वैद्यकीय समितीच्या अहवालानंतर कारवाई



मृतक भाग्यश्री धाईस्कर



डॉक्टर मीनल भेलोंडे

### माझे समाधान झाले नाही

माझ्या पत्नीला हेतू पुरस्कार हे भेलोंढे मॅडमने चुकीचे निदान केल्यामुळे माझ्या पत्नीचा नाहक बळी गेला चुकीच्या पद्धतीने निदान केले नसते तर माझ्या चिमुकलीला आई व मला पत्नी मिळाली असती परंतु शासकीय योजनेतून सिझर करताना पैसे घेऊनही माझ्या पत्नीला उपचार मिळाला नसल्याने माझ्या पत्नीचा व माझ्या बाळाच्या आईला न्याय मिळाला नाही त्यामुळे झालेल्या कारवाईने माझे समाधान झाले नाही.

**प्रदीप शिवाजी घाईसकर**
**सावरगाव गोरे**

**पुसद (महेश मुंढे) :** येथील उपजिल्हा रुग्णालयात डॉक्टरांचा हलगर्जीपणा व चुकीच्या पद्धतीने उपचार केल्याने एका गर्भवतीचा प्रसूतीदरम्यान रक्तस्राव होऊन मृत्यू झाला. या प्रकरणी महिला वैद्यकीय अधीक्षकावर पुसद शहर पोलिसांनी गुन्हा नोंदविला. डॉ. मीनल भेलोंडे पवार असे गुन्हा नोंद झालेल्या महिला वैद्यकीय अधीक्षकांचे नाव आहे. मृत्यूची घटना १९ मार्च २०२४ ची असून, या प्रकरणात २० मार्च २०२५ रोजी एक वर्षानंतर वैद्यकीय समितीच्या अहवालावरून गुन्हा दाखल झालाय. प्रदीप शिवाजी धाईस्कर (३०) रा. सावरगाव गोरे, असे तक्रारदाराचे नाव आहे. भाग्यश्री प्रदीप धाईस्कर या महिलेला १८ मार्च २०२४ रोजी उपजिल्हा रुग्णालयामध्ये प्रसूतीसाठी आणले. त्यावेळी तेथील नर्सने सिझरसाठी यवतमाळ येथे खासगी दवाखान्यात नेण्याचा सल्ला दिला. अर्जदार हा पत्नीला यवतमाळ येथे घेऊन जाण्यासाठी तयार होता. मात्र डॉ. मीनल भेलोंडे (पवार) या तिथे आल्या. माझ्या खासगी दवाखान्यात सिझर केले तर तुम्हाला ५० हजार रुपये खर्च लागेल. सरकारीत आला. तेथूनही महिलेला यवतमाळ येथे रेफर करण्याचा सल्ला डॉक्टरांनी दिला. दरम्यान भाग्यश्री मृत्यू झाला. याप्रकरणी वैद्यकीय समितीच्या अहवालावरून वैद्यकीय अधीक्षक डॉ. मीनल बिरबल पवार (भेलोंडे) यांच्याविरुद्ध शहर पोलिसांनी दि.२० मार्च २०२५ रोजी विविध कलमान्वये गुन्हे नोंद करण्यात आले आहे प्रकरणाचा अधिक तपास शहर पोलीस ठाण्याचे ठाणेदार उमेश बेसकर यांच्या मार्गदर्शनात साहेब पोलीस निरीक्षक धीरज बांडे करीत आहे. सिझर केल्यास २० हजार रुपये लागेल असे त्यांनी सांगितले. त्यानंतर डॉ. मीनल पवार यांनी सायंकाळी भाग्यश्रीचे सिझर केले. लगेच ५ ते १० मिनिटांनी भाग्यश्रीला बेडवर आणून टाकले. मात्र, एक तासाने भाग्यश्रीला रक्तस्राव सुरू झाला. डॉक्टर व नर्सला सांगूनही त्यांनी दुर्लक्ष केले. डॉ. भेलोंडे या रात्री ११ वाजता आल्या आणि त्यांनी कोणताही उपचार न करता खासगीत भरती करण्याचा सल्ला दिला. खासगीत ६० ते ६५ हजार रुपयांचा खर्च

# काला दहीहंडी फोडुन नाथषष्ठी महोत्सवाची सांगता




**पैठण (नंदु चव्हाण) :** खडकी सोडियेला मोटा । आजचा दहिकाला गोमटा । घ्या रे घ्या रे दहिभात । आम्हा देतो पंढरीनाथ । कालाअष्ठमीच्या मुहूर्तावर शनिवारी (दि.२२ मार्च) रोजी सायंकाळी सूर्यास्त समयी बाहेरील नाथमंदिरात नाथवंशज ह.भ.प. रावसाहेब महाराज गोसावी यांच्या हस्ते मंदिराबाहेरील डोममधील नाथसंस्थानची काला दहीहंडी बालक वारकऱ्याच्या हस्ते फोडुन तीन दिवसांपासून सुरु असलेल्या नाथषष्ठी महोत्सवाची सांगता करण्यात आली. यावेळी खासदार संदिपान भुमरे, खासदार कल्याण काळे, आमदार विलास भुमरे, माजी खासदार चंद्रकांत खैरे, हभप अंमळनेरकर महाराज, पुरुषोत्तम महाराज पाटील, रघुनाथ बुवा गोसावी, मुख्याधिकारी संतोष आगळे, तहसीलदार दत्ता भारस्कर, उपविभागीय पोलीस अधिकारी सिध्देश्वर भोरे पो. नि. संजय देशमुख, नाथसंस्थानचे कार्यकारी विश्वस्त दादा बारे, दुध संघाचे संचालक नंदलाल काळे, शिवाजी बँकेचे चेअरमन रवींद्र काळे, जगन्नाथ काळे, विनोद बोंबले, माजी नगराध्यक्ष सुरज लोळगे, सोमनाथ परदेशी, दत्ता गोर्डे, कॉंग्रेसचे तालुकाध्यक्ष विनोद तांबे, नंदकुमार पठाडे, नामदेवराव खराद, ज्ञानेश्वर कापसे, अप्पासाहेब निर्मळ, शिवसेना शहरप्रमुख तुषार पाटील, किशोर तावरे, किशोर चौधरी, जितु परदेशी, भुषण कावसनकर, पवन लोहीया, अनिल हजारे, रामेश्वर सुसे, उमेश तट्टू, शहादेव लोहारे, सुनिल हिंगे, संजय कस्तुरे, प्रशांत जगदाळे, बाळासाहेब माने, जनार्दन मिटकर, विष्णू खंडागळे, अमोल जाधव आदीसह मोठ्या संख्येने भाविक हजर होते. यावेळी मंदिरात वारकऱ्यांनी व राजकीय नेत्यांनी टाळ मृदंगाच्या गजरात पावली व फुगडी खेळली.तीन दिवस चाललेल्या या महोत्सवासाठी राज्यातून परराज्यातील लाखो वारकऱ्यांसह संत, महंत, विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांनी नाथचरणी नतमस्तक होऊन दर्शन घेतले. यावेळी मोठ्या संख्येने महिला, पुरुष वारकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. काला दहिहंडीचा सोहळा बघण्यासाठी मंदिरात वारकरी, भाविकांनी मोठी गर्दी केली होती. पंरपरेनुसार गावातील नाथ वाड्यातुन नाथ वंशजाची मानाची दिंडी वाळवंट मार्गाने सांयकाळी बाहेरील नाथ समाधी मंदीरात दाखल झाली. यावेळी वारकरी, भाविकांनी भानुदास-.एकनाथांचा जयघोष करीत टाळमृंदगाच्या तालावर ठेका धरीत सातपावली, खेळत आनंद साजरा केला. तीन दिवस सोहळ्यात सहभागी झालेल्या शेकडो दिंड्या व वारकरी, भाविकांनी शनिवारी काला अष्ठमीच्या मुहूर्तावर सकाळपासून आपल्या फडावर किर्तनाचा कार्यक्रम घेत काला दहिहंडी फोडुन काल्याच्या प्रसादाचा लाभ घेत वारकरी, भाविकांनी घराची वाट धरली. खांद्यावर भगवी पताका, टाळ , विणा , पखवाज घेऊन आम्ही जातो आमुच्या गावा । आमुचा रामराम घ्यावा ।। असे अभंग गात वारकऱ्यांनी पैठण नगरीचा निरोप घेतला.

# डी. ना. जाधव यांची जिल्हा कार्याध्यक्षपदी निवड



**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्र अंधश्रध्दा मिर्मुलन समिती छत्रपती संभाजीनगर जिल्हा कार्याध्यक्षपदी साहित्यिक डि.ना.जाधव यांची निवड रविवार २३ मार्च या दिवशी जिल्हा प्रेरणा मेळाव्यात सर्वानुमते करण्यात आली. सदर निवडीची अधिकृत घोषणा राज्य सरचिटणीस शहाजी भोसले यांनी केली.जिल्ह्यात सभासद नोंदणी करून नवीन शाखा स्थापन करणे,शाखा पदाधिकारी यांचे प्रशिक्षण घेणे,दर चार महिण्याला शाखांना. भेटी देणे, चार महिण्याला जिल्हा बैठक आयोजित करुन राज्य बैठकांना उपस्थित रहाणे असे कार्याध्यक्ष यांचे कार्य असल्याचे राज्य सरचिटणीस शहाजी भोसले यांनी सांगितले. डि.ना.जाधव हे गेल्या अनेक वर्षापासून संस्थेत कार्यरत असून त्यांच्या कार्याची दखल घेऊन सर्वानुमते त्यांची जिल्हा कार्याध्यक्षपदी निवड करण्यात आली. डि.ना.जाधव यांनी मुदिता,वेदनांचा आलेख,सूर्याच्या शोधात जेव्हा, काळोखातला सूर्य,हाडाचे जिवंत सापळे,हरिणीचे पाडस,अस्वस्थ मनाचे प्रदेश, शोध, यातना,माझा बाप अन् मी,प्रेम साक्षी, बुध्द भूमी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, साहित्यिकांची ओळख, झेप, शिदोरी, संजीवनी, आशा आणि झेप: सिंहावलोकन या ग्रंथाचे लेखन केले आहे.त्यांना फुले-शाहू- आंबेडकर पुरस्कार,आदर्श जीवन गौरव पुरस्कार देऊन अनेक संस्थांनी सन्मानित केले आहे. मायभूमीचे शुभ्र चांदणे, बाबासाहेब... एकदा तुम्ही येवुन जा! ,परिवर्तनाकडे चला, मायमाती आणि नातीगोती ,स्मशानातली फूले यासारख्या नामांकित पुस्तकाचे प्रकाशन त्यांनी केले आहे. जिल्हाध्यक्षाची निवड करून लवकरच जिल्हा कार्यकारीणीची घोषित करणार असल्याचे डि.ना.जाधव यांनी सांगितले.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002